सातारा, गुरुवार, ९ नोव्हेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

ग्रंथालय कोरेगाव

# नॅक मूल्यांकनात 'रयत'ची आघाडी

## तब्बल १७ कॉलेजचे यश; सिंगल फॅकल्टीत साताऱ्याचे 'सीएस' अव्वल

सातारा, ता. ८ : देशातील ११६ महाविद्यालयांचे 'नॅक' च्या (राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद) वतीने केलेल्या तिसऱ्या मूल्यांकनाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयांनी त्यात उज्ज्वल यश मिळविले आहे. सहा महाविद्यालयांनी ए प्लस, सात महाविद्यालयांनी ए, तर चार महाविद्यालयांनी बी प्लस प्लस श्रेणी मिळवली आहे.

पान ४ वर »

### शिवाजी कॉलेजचे यश

साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी कॉलेज या कर्मवीर भाऊराव पाटील यांनी गरीब मुलांसाठी कमवा आणि शिका याजनेसह सुरू केलेल्या संस्थेच्या पहिल्या कॉलेजने नॅकच्या तिसऱ्या मूल्यांकनात सिंगल फॅकल्टी (कला विभाग) असलेल्या कॉलेजमध्ये ३.५१ गुणांसह अव्वल स्थान मिळविले आहे. संस्थेचे सचिव डॉ. भाऊसाहेब कराळे हे या कॉलेजचे प्राचार्य असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजने अल्पावधीत सर्वांगीण प्रगती साधली आहे. त्याबाबत डॉ. कराळे म्हणाले, ''कॉलेजमध्ये बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. कॉलेजमध्ये गरीब विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' योजना सुरू आहे. सर्व विद्यार्थ्यांना आवश्यक भौतिक सुविधा मिळाव्यात, त्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी आम्ही विविध उपक्रमातून सतत प्रयत्न करत असतो.''



**"महाविद्यालये व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्था, महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, सेवक सारेजण प्रामाणिक प्रयत्न करतात. त्यामुळेच आमची महाविद्यालये 'नॅक'च्या मूल्यांकनात यश मिळवत आहेत. महाविद्यालये दर्जेदारच राहावीत, त्यातून गुणवत्तापूर्ण विद्यार्थी व उद्याचे सुज्ञ नागरिक घडावेत, यासाठी आम्ही काळजी घेत आहे.**

**- डॉ. अनिल पाटील,**
कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था

# 'डीपी' महाविद्यालयास नॅकची 'अ' श्रेणी

कोरेगाव, ता. ८ : येथील डी. पी. भोसले महाविद्यालयास नॅकची 'अ' श्रेणी प्राप्त झाल्याने कोरेगाव परिसरात आनंद व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबरोबरच संशोधन क्षेत्रात महाविद्यालय भरीव काम करत असल्याची नोंद यानिमित्ताने घेण्यात आल्याचे पत्रकात नमूद केले आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन समितीने केलेल्या मूल्यांकनानुसार महाविद्यालयास तीन पूर्णांक १२ दशांश सीजीपीएसह 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे, असे नमूद करून पत्रकात म्हटले आहे, की समितीचे अध्यक्ष डॉ. रतनलाला गोधरा (माजी कुलगुरू हेमचंद्राचार्य विद्यापीठ,




**कोरेगाव : 'नॅक' समितीकडून प्रमाणपत्र स्वीकारताना प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत.**

उत्तर गुजरात), समन्वयक प्रोफेसर विश्वनाथ हिरेमठ (माजी प्राचार्य, पी. सी. जाबीन शास्त्र महाविद्यालय, हुबळी), सदस्य डॉ. मझर असिफ (प्रोफेसर, परसियन विभाग, गुवाहाटी विद्यापीठ, गुवाहाटी) यांच्या समितीने महाविद्यालयाचे मूल्यांकन केले. आयक्युएसीचे प्रमुख डॉ. गणेश जाधव यांनी समन्वयक म्हणून समितीशी संवाद केला. समितीने महाविद्यालयातील विद्यार्थी केंद्रित व अध्यापन केंद्रित उपक्रमांचे कौतुक करून राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा विभाग, बॉईज व लेडीज लेजर स्पेस आदी घटकांचाही गौरव केला. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रेझेंटेशनद्वारे महाविद्यालयातील विविध उपक्रमांची ओळख करून दिली होती.

महाविद्यालयास मिळालेल्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार, महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. पतंगराव कदम, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे आदींनी अभिनंदन केले आहे.